सं.फौ.ख.क्र. ७६३/२०२४
निशाणी क्र. २१

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. २ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** दादा शाबा भरणे
**वयः** ५० वर्षे, **व्यवसायः** शेती,
**पत्ताः** मौजे भरणेवाडी, ता. इंदापूर जि. पुणे.

<u>**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**</u>

दिनांक ०३/०४/२०२३ रोजी मला पोलीसांनी घटनास्थळी जंक्शन—कळस रस्त्यावर आहे. सदरचे घटनास्थळ हे सुरेश भरणे दाखवित होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

<u>**उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. आर. बनसोडे यांचे मार्फत शपथेवर**</u>

२. सुरेश भरणे हे माझ्या भावकीतील आहेत. ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी मी दवाखान्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पेशंटला इंदापूरला नेहले त्यावेळेस मी त्याच्याबरोबर होतो. पेशंटला दुपारनंतर इंदापूरला नेहले होते आणि घरी यायला साधारण दिवस मावळला होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्यादिवशी माझा संपूर्ण दिवस पेशंट इंदापूरला नेहून पोस्टमॉटम करून आणणे याच्यातच गेला. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्यादिवशी मी घटनास्थळावर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.04.02 17:56:21 +0530

ठिकाण इंदापूर
दिनांक ०२/०४/२०२५

(जे.एन.भस्मे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.